International Research Journal ISSN-0975-3486 RNI : RAJBIL 01488 VOL. I * ISSUE—1

शोध पत्र—समाजशास्त्र

SEPT—2009

# स्त्री भ्रूण हत्या: एक सामाजिक समस्या

प्रा. कु. महानंदा राऊतखेडकर

समाजशास्त्र विभाग, पीपल्स कॉलेज, नांदेड ( महाराष्ट्र )

**प्रस्तावना**

मानवाने आज २१ व्या शतकात ज्ञान, विज्ञान, तंत्रानाच्या सहाय्याने स्वत:ची सर्वांगीण प्रगती साध्य करून घेतली आहे. आज एकीकडे प्रगती तर दुसरीकडे अधोगती असे परस्परविरोधी स्थिती समाजात दिसून येते. यात प्रामुख्याने स्त्री-पुरुष संख्येचा, त्यांच्या दर्जाचा विचार जेंव्हा आपण करतो तेंव्हा दिवसेंदिवस स्त्रियांची संख्या पुरुषांच्या संख्येच्या प्रमाणात कमी होत आहे. पूर्वीच्या काळी 'पहिली बेटी तुप रोटी' असे म्हटल्या जायचे. पण आजच्या आधुनिक समाजात जेंव्हा मुलाला वंशाचा दिवा, मोक्षप्राप्तीचे साधन मानल्या जाते, तेंव्हा जगात आर्थिक महासत्तेकडे वाटचाल करणाऱ्या भारताला शरमेने मान खाली घालणे भाग पडते.

स्त्री भ्रूण हत्या करतांना बऱ्याचदा हे विसरल्या जाते की ज्या स्त्री भ्रूणाची हत्या केली जाते तीच्यातून समाजाची निर्मिती झाली, तीच्यातून पुढे समाजाला स्थैर्य व निरंतरता प्राप्त होणार आहे. तसेच सावित्रीबाई फुले, इंदिरा गांधी, प्रतिभाताई पाटील, कल्पना चावला, सुनिता विल्यम्स, सानिया मिर्झा, पी.टी.उषा, गार्गी, मैत्रेयी अशा कितीतरी क्षेत्रातील स्त्रियां ज्यांनी देशाला, समाजाला नावलौकिक मिळवून दिला त्या स्त्री भ्रूणच होत्या. मग त्यांची हत्या का? असा एक प्रश्न मानवी बुद्धी व मनाला पडणे अत्यंत आवश्यक आहे. पण तो पडत नाही हीच मूळात एक समस्या आहे.

**कार्यक्षेत्र व संशोधन पद्धती :** प्रस्तुत संशोधन निबंधासाठी कोणत्याही गावाची, शहराची मर्यादा न ठेवता उपलब्ध झालेल्या दुय्यम तथ्य सामुग्रीचा आधार घेण्यात आला आहे.

**संशोधन आराखडा :** प्रस्तुत संशोधन निबंधासाठी वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा उपयोग करण्यात आला आहे.

**उद्देश :** स्त्री भ्रूण हत्या या विषयी चिकित्सक अध्ययन करणे.

**व्याप्ती व मर्यादा :** स्त्री भ्रूण हत्या ह्या संबंधी वैद्यकिय, धार्मिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक या सर्व दृष्टीकोनातून अध्ययन केल्या जाते. ह्या विषयाची व्याप्ती अमर्यादित आहे. परंतु, या संशोधन निबंधात स्त्री भ्रूण हत्येचा अर्थ, कारणे, कायदे, उपाययोजना यांचा थोडक्यात आढावा घेण्यात आला आहे.

**गर्भजल चिकित्सेचा अर्थ व प्रकार :** गर्भजल चिकित्सा म्हणजे "गर्भावस्था धारण केलेल्या स्त्रीच्या पोटामध्ये मुलगा अथवा मुलगी यापैकी कोणते लिंग आहे याची बाळाच्या जन्मापूर्वीच चाचणी करणे होय". सर्वसामान्यपणे गर्भजल चिकित्सापद्धती अथवा लिंगपूर्व निवड चाचण्या खालीलप्रमाणे आढळून येतात. (१) सोनोग्राफी (२) मातेच्या गर्भात असणाऱ्या पाण्याची तपासणी (३) फोटोकॉपी (४) थोरिअम बायोप्सी (५) निडलिंग इत्यादीमुळे गर्भातील अपत्त्यांचे लिंग कोणत्या प्रकारचे आहे हे समजते. परंतु, गर्भातील लिंग हे जर स्त्रीचे असेल तर डॉक्टरांच्या सहाय्याने गर्भाचा गर्भपात घडवून आणला जातो. गर्भात वाढणाऱ्या अर्भकामध्ये काही दोष किंवा विकृती आहेत काय हे पाहण्यासाठी अशा चाचण्या खूपच गरजेच्या आहेत मात्र सध्या या प्रगत तंत्राचा गैरवापर होत आहे. जर गर्भातील लिंग मुलगी असेल तर स्वेच्छेने गर्भपात केला जातो. गेल्या दहा वर्षात पंजाब व हरियाना राज्यात स्त्रियांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात घट झाली.

मादाम क्युरी यांनी सन १८८० मध्ये विझो इलेक्ट्रीक 'इफेक्ट' या तंत्राचा शोध लावला. त्यानंतर शंभर वर्षांनी याच भक्कम आधारावर 'सोनोग्राफी' ही आधुनिक वैद्यकिय निदान पद्धती उभी राहिली[१].

**स्त्री भ्रूण हत्येची कारणे :** १) प्रत्येक दांपत्यांना वाटत असते की, 'हम दो-हमारे दो', म्हणजेच प्रथम मुलगी झाली की दुसरा मुलगाच हवा असतो आणि म्हणूनच मग नंतर जर मुलगी असेल तर मुलीचा गर्भ काढून टाकला जातो. २) भारतीय परंपरेनुसार पुत्रप्राप्तीनेच मोक्षप्राप्ती,

आत्म्याची मुक्ती होते असे मानले जाते म्हणून मग मुलगी असल्यास तीचा गर्भपात केल्या जातो. ३) मुलगी ही परक्याचे धन मानले जाते म्हणजे ती लग्नानंतर पतीच्या घरी जाते पण मुलगा मात्र लग्न करून पत्नीला घरी आणत असल्याने कुटूंबपद्धती टिकून राहते. ४) मुलगा वंशाचा दिवा, इस्टेटीचा वारसदार असतो. त्याच्या नावावर पैशाचा विस्तार होतो. तो पुढे चालतो. ५) पारंपारीक, ग्रामीण किंवा गरीब कुटूंबामध्ये मुलगी नाही तर मुलगाच आपला सांभाळ करेल अशी समजूत असते. ६) मुलीला विवाहासाठी हुंडा द्यावा लागतो मात्र मुलगा झाला तर हुंडा मिळत असतो. ७) मुलगी म्हणजे जास्तीची जबाबदारी असते असे बऱ्याचदा वाटते. ८) मुलीसोबत कुटूंबाची, विशिष्ट समुदायाची प्रतिष्ठा, मानमरातब जोडलेली असते. मुलाच्या बाबतीत असे काही नसते.

**स्त्रीयांचे घटते प्रमाण** -स्त्रीभ्रूणहत्येला वरीलप्रमाणे व इतरही अनेक कारणे जबाबदार आहेत. त्यामुळे दिवसेंदिवस देशात व विविध राज्यात दर हजार पुरुषांमागे स्त्रियांचे प्रमाण कमी होत चालले आहे.

**दर हजार पुरुषांमागील स्त्रियांची संख्या**

| वर्ष | स्त्रियांची संख्या |
|---|---|
| १९०१ | ९६२ |
| १९५१ | ९४६ |
| १९८१ | ९३४ |
| १९९१ | ९२६ |
| २००१ | ९३३ [२] |

**गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदान तंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध) अधिनियम १९९४** :-गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदान तंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध) अधिनियम १९९४ साली अस्तित्त्वात आला. गर्भलिंग तपासणी आणि गर्भलिंग निश्चिती दोन्हीही प्रथांवर बंदी आणणे हा या कायद्याचा प्रमुख उद्देश आहे. २००१ साली दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिकेमार्फत या कायद्यामध्ये काही सुधारणा सुचविण्यात आल्या. परिणामी, गर्भधारणेपूर्वी गर्भलिंग निदान करणाऱ्या तंत्रावरही बंदी आणण्याची तरतूद या कायद्यामध्ये करण्यात आली.

**कायद्यामधील ठळक तरतूदी :-**

⭑ गर्भधारणेपूर्वी लिंग निश्चिती आणि गर्भधारणेनंतर गर्भाचे लिंग तपासणे यावर बंदी. ⭑ गरोदरपणातील तपासण्यांवर नियंत्रण (उदा.गर्भजल चिकित्सा व सोनोग्राफी) गर्भधारणेपूर्वी व गरोदरपणातील तपासण्या फक्त गर्भामध्ये अनुवंशीक व्यंग असण्याची शक्यता तपासण्यासाठी या तंत्राचा वापर करण्यास कायदा परवानगी देते. ⭑ या तंत्रज्ञानाची गर्भलिंग निवडीसाठी जाहिरात करण्यावर कायदेशिर बंदी. ⭑ या कायद्यांतर्गत नोंदणी न झालेल्या व्यक्तिंना सोनोग्राफी मशीन विकण्यासही बंदी. ⭑ या कायद्यातील तरतुदींचे उल्लंघन करणाऱ्यांसाठी शिक्षेची तरतुद. ⭑ अत्यावश्यक कारणासाठी प्रसवपूर्व निदान तंत्राचा वापर करण्यापूर्वी संबंधित गरोदर महिलेची लेखी संमती घेणे व या तपासणीनंतर गर्भस्थ शिशुचे लिंग कळविले जाणार नाही असे लेखी कळविणे केंद्रचालकांना बंधनकारक.

**शिक्षा आणि दंड :**

⭑ गर्भलिंग निदानाची सुविधा उपलब्ध असल्याची जाहिरात कोणत्याही प्रकारे करण्यास प्रतिबंध, या तरतुदीचा भंग केल्यास तीन वर्षापर्यंत तुरूंगवासाची शिक्षा व १० हजार रूपयांपर्यंत दंड. पुरावृत्ती झाल्यास पाच वर्षांपर्यंत तुरूंगवास व ५० हजार रूपयांपर्यंत दंड. ⭑गुन्हा सिद्ध झाल्यास संबंधित वैद्यकिय व्यावसायिकांची नोंदणी दोन वर्षासाठी आणि पुनरावृत्ती झाल्यास कायमस्वरूपी रद्द करण्याची तरतूद. ⭑ गरोदर महिलेला जबरदस्तीने गर्भलिंग चिकित्सा तपासणी करण्यास भाग पाडणारा नवरा, नातेवाईक यांना उचित कायद्यानुसार शिक्षेची तरतुद.[३]

**स्त्री भ्रूण हत्या थांबविण्यासाठी उपाययोजना**

⭑ गर्भलिंग चाचणी करणाऱ्या व्यक्तिंवर कडक कायदेशिर कार्यवाही करावी.⭑ मुलगा आणि मुलगी असा समाजातून व पालकांच्या मनातून असणारा भेदाभेद दूर करावा. ⭑ स्त्रियांना मारक ठरणाऱ्या सर्व रूढी, परंपरा नष्ट करणे. ⭑ स्त्री ही राष्ट्राची मानवी संपत्ती आहे. तिचा आर्थिक विकास प्रक्रियेत पूर्ण सहभाग करून घेतला पाहिजे यामुळे देशाचा सर्वांगीण विकास तर होईलच पण स्त्रियांचा समाजातील दुय्यमत्त्वही नष्ट होईल. ⭑स्त्री भ्रूण हत्येचे प्रमाण जर असेच राहिले तर भविष्यात व सद्यःपरिस्थितीतही अनेक सामाजिक समस्यांना सामोरे जावे लागेल. स्त्रियांना बलात्कार, बहुपती विवाहांना देखील सामोरे जावे लागेल अशा प्रकारची जाणिवजागृती, जनजागृती समाजात विशेषतः स्त्रियांमध्ये होणे गरजेचे आहे. ⭑ स्त्रीभ्रूणहत्येविरोधात विविध महिला संघटनांनी स्त्री भ्रूण हत्येविरोधात आपली प्रभावी भूमिका बजावावी.⭑ शासनाने मुलींसाठी, स्त्रियांसाठी त्यांचा दर्जा, उंचावण्यासाठी व त्यांचे दुय्यमत्त्व नष्ट करण्यासाठी अस्तित्त्वात असलेल्या विविध योजनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी व भविष्यात अनेक नवीन योजनांची निर्मिती करावी.

## सन्दर्भ ग्रन्थ


१) स्त्री भ्रूण हत्या : वास्तव, संपा.अॅड.वर्षा माडगूळकर, पृ.५१
२) बायजा जून २००६, पृ. १३
३) लोकराज्य, जुलै २००७, पृ. १२